**संक्षिप्त फौ.ख.क्र. ९२४/२०२५** **निशाणी क्र. १०/लगत**

**<u>फिर्यादीसाठी साक्षीदार क्र. १ चा उलटतपास शपथेवर सुरू</u>**

**<u>उलटतपास आरोपीसाठी श्री. एस.वाय.मुल्ला वकिल.</u>**

१. मी आरोपीला ७ ते ८ वर्षापासून ओळखतो. सन २०२२ ते २०२३ साली चांदीचा व्यवसाय करीत होतो. माझे एम.पी.ज्वेलर्स नावाने हुपरी येथे दुकान आहे व मी हुपरी येथेच राहतो. आरोपीची व माझी चांदी व सोन्याच्या व्यवसायातून ओळख झाली होती. आरोपीमध्ये व माझ्यामध्ये चांदी सोन्याचे व्यवहार होत होते. आरोपी हे माझ्याकडून सोन्याचे दागिने खरेदी करीत होते. हे म्हणणे खरे आहे की, खरेदी व्यवहारामध्ये पावती बनविली जाते. आरोपीने सोन्याचे दागिने खरेदी केल्याची मी बिले बनवून घेतलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, याकामी तसे कोणतेही बील मी दाखल केलेले नाही.

२. हे म्हणणे खरे आहे की, मी स्वताः आरोपीविरूध्द फसवणूकीची तक्रार जिल्हा पोलीस अधिक्षक यांचेकडे दिलेली नाही. साक्षीदार स्वताः सांगतो, माझ्या आईने तक्रार दिलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी जिल्हा पोलीस अधिक्षक यांचेकडे तक्रार देण्यासाठी मी समक्ष हजर नव्हतो. चंद्रगुप्त हिराकांत नवाळे यांना मी ओळखतो. चंद्रगुप्त नवाळे व माझे व्यवसायईक संबंध आहेत. हे म्हणणे खरे आहे की, चंद्रगुप्त नवाळे यांनीही माझी फसवणुक केली आहे अशी तक्रार माझ्या आईने जिल्हा पोलीस प्रमुख यांचेकडे दिली होती.

३. आरोपीने मला वादातील धनादेश दिला त्यावेळी माझ्या व्यतीरिक्त कोणीही हजर नव्हते. माझी आई आरोपीच्या घरी गेली होती. मी आरोपीच्या घरी गेलो नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीच्या घरी काय घडले यांची मला माहिती नाही. मी व्यवसाय सुरू करण्यापुर्वी माझ्या वडीलांचाही सोनेचांदीचाच व्यवसाय होता. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वडीलांना कोरोना काळापुर्वी सन २०१७-१८ सालामध्ये व्यवसाय बंद केला.

४. मी दि. २३/१०/२०२५ रोजी हुपरी पोलीस ठाणेत आरोपीविरूध्द अर्ज दिला होता. साक्षीदार पुन्हा सांगतो की, साल २४ किंवा २५ असु शकते. हुपरी

पोलीसांनी आरोपीला बोलावले होते त्यावेळी मी हुपरी पोलीस ठाणेत हजर होतो. हे म्हणणे खरे नाही की, माझा आरोपीविरूध्द तक्रारी अर्जाबाबत कोणताही वाद राहिलेला नाही असे मी हुपरी पोलीसांना लिहून दिलेले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझी आरोपीविरूध्द असलेली तक्रार निकाली काढावी म्हणून मी हुपरी पोलीसांना लिहून दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी हे ब-याच वर्षापासून कोल्हापूर येथे राहतात.

५. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यामध्ये व आरोपीमध्ये कोणताही व्यवहार घडलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझे कोणतेही देणे लागत नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादातील धनादेश आरोपीने मला कधीही स्वताःलिहून सही करून दिला नव्हता. आरोपीमध्ये व माझ्यामध्ये सोनेचांदी खरेदीचे व्यवहार झाले होते हा मजकूर माझ्या विधीज्ञांना फिर्याद देतेवेळी सांगीतले होते. सदरचा मजकूर माझ्या फिर्यादीमध्ये कोठेही नमुद नाही हे खरे आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीचा माझ्या आईसोबत कोणताही व्यवहार नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीचा चेक मी आरोपीच्या सांगण्यावरून माझ्या खात्यात भरला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, १० दिवसानंतर सदरचा चेक पुन्हा भरा असे सांगीतले त्याप्रमाणे मी चेक भरला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला नोटीस पाठविली, ती नोटीस आरोपीने स्वीकारली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी व माझ्यामध्ये कोणताही व्यवहार नसताना मी आरोपी विरूध्द खोटी फिर्याद दाखल केलेली आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

ठिकाण- इचलकरंजी

दिनांक- ३०/०१/२०२६.

(**डी.बी.साठे**)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, न्यायालय क्र. २,
इचलकरंजी.